# आदेश

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ३१ ऑक्टोबर २००३

**मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८**

क्रमांक- मुद्रांक २००३/प्र.क्र.१७५/म-१ - ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९ च्या, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री पटल्यामुळे, महाराष्ट्र शासन, याद्वारे स्थानिक प्राधिकरणाने तयार केलेल्या विकास नियंत्रण नियमानुसार हस्तांतरणीय विकास अधिकारांच्या मंजूरी अनुसार किंवा यथास्थिती, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकानुसार सार्वजनिक सुखसोयी देण्यासाठी स्थावर मालमत्तेचे विनामूल्य हस्तांतरण किंवा विकास किंवा बांधकाम याचा अंतर्भाव असलेल्या, राज्यातील कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपरिषदेच्या (यात यापुढे ज्यांचा निर्देश संयुक्तपणे "स्थानिक प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) नावाने कोणत्याही व्यक्तीने निष्पादीत केलेल्या संलेखावर, उक्त अधिनियमाची अनुसूचि-एक मधील अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( रमाकान्त असमर )**
**शासनाचे सहसचिव**